## विषयसूची

१. प.पू. भक्तराज महाराज यांचा संक्षिप्त परिचय ५
२. प.पू. भक्तराज महाराज निर्देशित भजन-भावार्थ सुगमरित्या लिहिणारे कै. चंद्रकांत उपाख्य दादा दळवी ! ७
३. 'भजन हे ओठांतून नव्हे, तर नाभीतून म्हणायला हवे', हे प.पू. भक्तराज महाराजांकडून शिकणाऱ्या सौ. उल्का बगवाडकर ! १०
४. प.पू. डॉ. जयंत बाळाजी आठवले आणि डॉ. (सौ.) कुंदा जयंत आठवले यांच्याप्रती कृतज्ञता ! ११
५. भजनांचा सुगम अर्थबोध करून देऊन भजनानंदी डुंबवणारा ग्रंथ ! १२
६. ग्रंथातील लिखाणाच्या मांडणीविषयीची सूत्रे १३
**७. भजनांची अनुक्रमणिका १५**

## गुरूंनी दिलेल्या नामापेक्षा गुरूंचे नाव (नाम) सतत आठवत असल्यास काय करावे ?

**'डॉ. जयंत आठवले :** आपण दिलेल्या नामापेक्षा आपलीच आठवण होते. आपल्याच नामाचा जप होतो.

**प.पू. भक्तराज महाराज :** काही अडचण (हरकत) नाही. तो जप करा. (देवाचे आणि गुरूंचे नाम या दोन गोष्टी निराळ्या नाहीत, तर एकच आहेत.) सगुण निर्माण झालेल्या नामाला जरी जपले, तरी ते नाम निर्गुणापेक्षा अलग नाही; कारण त्या जपातही चैतन्य आहे. (प्रारंभी बऱ्याच जणांना गुरूंनी दिलेल्या नामापेक्षा गुरूंचीच आठवण होते; कारण ते देहबुद्धीत असतात. पुढे त्यांची देहबुद्धी घटल्यानंतर गुरूंच्या ठिकाणी त्यांनी दिलेल्या नामाची आठवण जास्त होते.)' F (DrA-६४ अ भ + BMT3 + PR 6 + PR 9-2)

**(संदर्भ : डॉ. जयंत आठवले संकलित सनातनचा ग्रंथ 'प.पू. भक्तराज महाराज यांची शिकवण - खंड ३')**

## विषयसूचीतील क्रमांक ३

## ‘भजन हे ओठांतून नव्हे, तर नाभीतून म्हणायला हवे’, हे प.पू. भक्तराज महाराजांकडून शिकणाऱ्या सौ. उल्का बगवाडकर !



**१. नाव आणि जन्म :** ‘सौ. उल्का नितीन बगवाडकर (पूर्वाश्रमीची कु. उल्का चंद्रकांत दळवी), जन्म २.११.१९४६, कल्याण (जिल्हा ठाणे).

**२. व्यावहारिक जीवन :** मी ‘केंद्रीय राजपत्रित अधिकारी’ म्हणून सेवानिवृत्त झाले. माझे यजमान श्री. नितीन वासुदेव बगवाडकर हे मुंबईतील ‘जे.जे स्कूल ऑफ आर्टस्’मधील ‘कमर्शियल आर्टिस्ट (G.D. Art)’ आहेत.

**३. प.पू. बाबांचे प्रथम दर्शन आणि त्यांची शिकवण :** मला प.पू. बाबांचे प्रथम दर्शन वर्ष १९६९-७० च्या काळात झाले. त्यांच्या प्रथम भेटीत मी संत गोरा कुंभार यांचा ‘तुझे रूप चित्ती राहो’, हा अभंग म्हटला होता. तेव्हा प.पू. बाबा म्हणाले, ‘‘भजन हे ओठांतून नाही, तर नाभीतून आले पाहिजे. मी तुला तसे म्हणायला शिकवीन.’’ त्यानंतर प.पू. बाबांचे प्रत्येक भजन माझ्या अंतरंगात उतरले आणि माझा प्राण झाले. प.पू. बाबा म्हणत, ‘भजन हे मोक्षाचे साधन आहे.’ ते प.पू. बाबांचे भजन मला मिळाले आहे.

**४. ग्रंथनिर्मितीच्या महान कार्यातील खारीचा वाटा ! :** ‘दादा दळवी यांना प.पू. बाबांची आज्ञा होती, ‘दळवीदादांनी त्यांचे कोणतेही लिखाण प्रथम सौ. उल्का यांना दाखवावे.’ त्यामुळे प.पू. बाबांच्या भजनांच्या भावार्थांचे लिखाण माझ्याकडे आले अन् या महान कार्यात मला खारीचा वाटा उचलता आल्याने मला आनंद झाला.


‘प.पू. बाबांच्या सर्व भक्तांना हा ग्रंथ वाचून पुष्कळ समाधान आणि आनंद मिळेल’, याची मला निश्चिती आहे.’ F (BMBh-Bha-DD)

।। हरि ॐ तत् सत् ।।

**– सौ. उल्का बगवाडकर (दादा दळवी यांच्या कन्या), पुणे** (७.४.२०२२)

विषयसूचीतील क्रमांक ५

# भजनांचा सुगम अर्थबोध करून देऊन भजनानंदी डुंबवणारा ग्रंथ !



डॉ. जयंत आठवले

'माझे गुरु प.पू. भक्तराज महाराज (प.पू. बाबा) म्हणत असत, 'भज मन', म्हणजे 'जे मनाला भजवते, रिझवते', ते 'भजन' ! प.पू. बाबा भजने म्हणायला आरंभ केल्यावर काही क्षणांतच ते भजनांशी पूर्णपणे एकरूप होत असत. ते भक्तांना नेहमी सांगत, 'केवळ भजनातील मधुरता आणि लय पाहू नका, तर अर्थ समजून घेऊन भजन म्हणा.' याचे कारण म्हणजे, अर्थ समजून घेऊन भजन म्हटले, तर भक्तीरसात डुंबण्याचा आनंद घेता येण्यासह चित्त चैतन्याशी जोडले जाते. यासाठीच प.पू. बाबा काही वेळा भजने म्हणतांना मध्ये मध्ये भजनांचा अर्थही श्रोत्यांना समजावून सांगत. भक्त भावपूर्ण भजने म्हणत नसले, तर प.पू. बाबा त्यांना 'भजनांचा अर्थ समजून घेऊन ती अंतःकरणापासून म्हणा', असे रागावून सांगत असत.

प.पू. बाबांचे प्रिय भक्त कै. चंद्रकांत (दादा) दळवी यांनी प.पू. बाबांच्या प्रासादिक वाणीतून प्रकटलेले भजनांचे अर्थ वेळोवेळी टिपून ठेवले असल्यानेच हा सुंदर अन् पवित्र ग्रंथ सिद्ध झाला आहे. प.पू. बाबांची ही भक्तीगाथा समष्टीला समजवण्यासाठी दादांनी केलेली ही ग्रंथसेवा अक्षरशः अनमोल आहे. यासाठी मी दादांप्रती कृतज्ञ आहे.

'या ग्रंथाच्या माध्यमातून साधक आणि भक्त यांना भजनांचे अर्थ नीट समजून त्यांना प.पू. बाबांच्या भजनामृताचा आस्वाद घेता यावा अन् त्यायोगे त्यांची साधनापथावरील वाटचाल अधिक चांगली व्हावी', अशी प.पू. बाबांच्या चरणी प्रार्थना !' – **डॉ. जयंत आठवले (प.पू. भक्तराज महाराज यांचे शिष्य) (११.८.२०२२)** F (DW-BMBh + BMBh-Bha-DD3)

# भजनांची अनुक्रमणिका

प्रस्तुत ग्रंथमालिकेच्या पहिल्या भागात १ ते २७ भजने आणि दुसऱ्या भागात २८ ते ७० पर्यंतची भजने समाविष्ट केली आहेत. या भागात ७१ ते ११५ पर्यंतची भजने अन् 'पुष्प मनाचे कर जोडोनिया ।' ही प्रार्थना समाविष्ट केली आहे.


| | |
|---|---|
| ७१. भरला मायेचा बाजार । | १७ |
| ७२. भाव नाही न भावनाही । | २० |
| ७३. मज देई चरण चाकरी । | २२ |
| ७४. मजला पागल म्हणू नका । | २३ |
| ७५. मधु मुरलीचा नाद तो । | २५ |
| ७६. मन माझे गुंतियले चरणी बा श्रीहरि । | २८ |
| ७७. मन रंगले आत्मारामी । | ३० |
| ७८. मनाला लागो ही आस । | ३३ |
| ७९. मम हृदयी कोण हे भासे । | ३६ |
| ८०. माझा होशील का । | ३९ |
| ८१. माझे मन मोहिले रे । | ४१ |
| ८२. माझ्या नाथांच्या दरबारी या हो । | ४३ |
| ८३. माझ्या पंढरीच्या नाथा । | ४५ |
| ८४. मानवा, जीवन हा संग्राम । | ४८ |
| ८५. मी काय करू गुरुराया । | ५१ |
| ८६. मी तो एक नर भाग्यवान खरा । | ५३ |
| ८७. मोहन का रुसला । | ५५ |
| ८८. मंगलात झाले मंगल । | ५६ |
| ८९. या गुरुराया मम मंदिरा । | ६१ |
| ९०. या गुरुराया या प्रभु वेगे । | ६३ |
| ९१. या माझ्या रामाच्या दरबारी । | ६५ |

| | | |
|---|---|---|
| ९२. | येई रे श्री येई आता ! | ६८ |
| ९३. | येती साई भक्ताघरी भोजना । | ७१ |
| ९४. | राम रूपी राम रंगी । | ७३ |
| ९५. | रामा तुझ्या द्वारी पसरीतो करा । | ७५ |
| ९६. | लज्जा राखावी राखावी । | ७७ |
| ९७. | लागो तुझा हा छंद । | ८१ |
| ९८. | लोटू नका मज लोटू नका । | ८३ |
| ९९. | वटवृक्ष पहा घनदाट । | ८५ |
| १००. | वर हाची प्रभु मज देई । | ८७ |
| १०१. | वाट पाहे भक्तांचा गोविंद । | ९१ |
| १०२. | विश्वेश्वर जो साईनाथ हे । | ९५ |
| १०३. | वेड्या वेड्या पहातो काय । | ९९ |
| १०४. | वेणू कुणी वाजविला । | १०२ |
| १०५. | वंदू या निखिल ब्रह्म अवधूता । | १०५ |
| १०६. | सदा स्मरी मुखा साईच्याची नामा । | १०७ |
| १०७. | सनाथ नाथा अंतराळ खोला । | १११ |
| १०८. | साई करिती हो भंडारा । | ११५ |
| १०९. | साईचरण मारी मज हाक । | ११८ |
| ११०. | साई श्याम जगी हे आले रे । | १२० |
| १११. | सोनियाच्या शिंपल्यात । | १२३ |
| ११२. | स्वतंत्र जीव हा । | १२६ |
| ११३. | हे प्रेम कसे । | १३० |
| ११४. | हे शुद्ध जीव आत्म्या । | १३२ |
| ११५. | ज्ञानचक्षू तुझे । | १३६ |
| 卐 | प्रार्थना – पुष्प मनाचे कर जोडोनिया । | १४१ |